आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२१ जून २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- योग साधनेनं आज साऱ्या जगाला जोडलं आहे, हा सुखद अनुभव असल्याचं प्रधानमंत्र्यांचं योगदिन कार्यक्रमात प्रतिपादन/देशभरात योगदिन कार्यक्रमात लाखोंचा सहभाग

- देशोदेशी योगदिन साजरा

- २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १९ जूनपर्यंत देशाचं एकूण प्रत्यक्ष कर संकलन गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत ४ पूर्णांक ८६ शतांश टक्के वाढ

**आणि**

- ऑपरेशन सिंधु अंतर्गत इराणमधून २९० भारतीय नागरिकांना घेऊन एक विमान काल रात्री नवी दिल्लीत

**<><><><>**

योग साधनेनं आज संपूर्ण विश्वाला जोडलं आहे हे बघणं अत्यंत सुखद आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विशाखापट्टणम मध्ये आज ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी देश - विदेशांतल्या नागरिकांना संबोधित केलं. सुरुवातीला त्यांनी सगळ्यांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला गेला, त्यावेळी १७५ देशांनी या प्रस्तावाला समर्थन दिलं.

योग निरोगी, संतुलित आणि अधिक अर्थपूर्ण जीवनाचा मार्ग दाखवतो. योग सगळ्यांसाठी आहे असा संदेश आज जगाच्या कानाकोपऱ्यांतून येत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी जगाच्या विविध भागांमध्ये वाढलेल्या तणाव, अशांतता आणि अस्थिरतेबद्दल चिंता व्यक्त केली. अशा काळात, योग साधना शांततेचा मार्ग देत असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड बाईट : प्रधानमंत्री PAUSE BUTTON (00.27 Sec.)**

आयुष मंत्रालयाच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात ३ लाख योगसाधक सहभागी झाले होते.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उधमपूर इथं तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह अहमदाबाद इथं योग साधना कार्यक्रमात सहभागी झाले. तसंच देशभरातल्या जिल्हा मुख्यालयांमधे, विद्यापीठं आणि सेवाभावी संस्थांमार्फत योग साधना कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यात विविध मान्यवर सहभागी झाले.

**<><><><>**

सांस्कृतिक मंत्रालयानं महाराष्ट्रासह देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर आणि ५० सांस्कृतिक स्थळांवर योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं. मुंबईजवळ कान्हेरी लेणी इथं आयोजित योग कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल सहभागी झाले. मुंबईतल्या घारापुरी लेणी, बुलडाण्यातलं गायमुख मंदिर, पुण्यातला आगा खानपॅलेस आणि शिवनेरी किल्ला, छत्रपती संभाजीनगरमध्ये बिबी का मकबरा तर अमरावतीत बौद्ध स्तूप इथं योग सत्रांचं आयोजन करण्यात आलं.

याशिवाय आसाममधलं चराईदेव मैदान, गुजरातमधे राणी की वाव आणि धोलावीरा, कर्नाटकात हंपी आणि पट्टदकल, मध्यप्रदेशात खजुराहो मंदिरं आणि सांची स्तूप, ओडिशात कोणार्क सूर्य मंदिर, आणि तामिळनाडूत तंजावर इथल्या बृहदीश्वर मंदिराच्या आवारात योग दिन साजरा झाला.

आजच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश-परदेशातून नोंदणी केलेल्या योग अभ्यासकांची संख्या १० लाखांच्या पुढे गेली आहे.

**<><><><>**

११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन महाराष्ट्रातही मोठ्या उत्साहात आणि विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. अनेक मान्यवरांनी स्वतः योगसाधना उपक्रमांमध्ये सहभागी होत योग साधनेचं महत्त्व पटवून दिलं.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुंबईत राजभवन इंथ आयोजित योगसत्रात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सहभाग घेतला. वाढत्या ताणतणावाच्या काळात मानसिक

आरोग्यासाठी योग महत्त्वाचा असल्याचं ते म्हणाले. सर्व विद्यापीठांमध्ये योगाभ्यास सुरू करण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकरी भक्तीयोग कार्यक्रमात वारकऱ्यांसोबत योग साधना केली. मंत्री चंद्रकांत पाटील आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ हे देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

नागपूरमध्ये यशवंत स्टेडियम इथं झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी योग साधना केली. आरोग्यदायी जीवनासाठी सर्वांनी योगाभ्यासाचा अंगिकार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

पुण्यात पंडित फार्म इथं आयोजित योगसत्रात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ सहभागी झाले.

भुसावळमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मंत्री गिरीश महाजन आणि संजय सावकारे यांच्या उपस्थितीत भव्य योगाभ्यास सत्र पार पडले. मुंबईत गेटवे ऑफ इंडिया इथं केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या उपस्थितीत योग कार्यक्रम झाला.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय योग दिवस देशोदेशी विविध कार्यक्रमांनी साजरा होत आहे. युकेमधे लंडन शहरातल्या महत्त्वाच्या स्थळांवर तसंच ऑक्सफोर्ड केंब्रिज आणि साऊदम्टन विद्यापीठांमधे विविध कार्यक्षेत्रातल्या लोकांनी योगदिनानिमित्त कार्यक्रमात भाग घेतला. आरोग्य, एकाग्रता आणि शाश्वतता या तत्त्वांचं महत्त्व पटवून देणारे कार्यक्रम झाल्याचं युकेतले भारतीय उच्चायुक्त विक्रम दोराईस्वामी यांनी समाजमाध्यमावर लिहिलं आहे. अमेरिकेत न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध टाईम्स स्क्वेअर मधे योगदिन साजरा झाला. जपानमधे टोकियो इथल्या त्सुकिजी होंग्वानजी बौद्ध मंदिरात आयोजित योगसाधना कार्यक्रमाचं उद्घाटन जपानी प्रधानमंत्र्यांच्या पत्नी शिगेरु, इशिबा, योशिको इशिबा यांच्या हस्ते झालं. सिंगापूरमधे समुद्रकिनारे, उद्यानं आणि विशाल वृक्षांच्या छायेत योगसाधकांनी हजेरी लावली. म्यानमां मधे मंडाले इथं भारतीय दूतावासातर्फे आयोजित कार्यक्रमात सुमारे ७०० योगसाधकांनी भाग घेतला. फिजी, पापुआ न्यू गिनी, आणि टोंगा इथंही योगदिन साजरा झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><>**

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १९ जूनपर्यंत देशाचं एकूण प्रत्यक्ष कर संकलन गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत ४ पूर्णांक ८६ शतांश टक्के वाढून सुमारे ५ लाख ४५ हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. मात्र एकूण प्रत्यक्ष कर संकलनात १ पूर्णांक ३९ शतांश टक्के किरकोळ घसरण नोंदवली गेली. ही घसरण प्रामुख्याने कर परताव्यात ५८ टक्के वाढ झाल्यामुळे आहे.

प्राप्तिकर विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या कालावधीत आगाऊ कर संकलन १ लाख ५५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं असून, यात ३ पूर्णांक ८७ शतांश टक्के वाढ झाली.

<><><><>

ऑपरेशन सिंधु अंतर्गत इराणमधून २९० भारतीय नागरिकांना घेऊन एक विमान काल रात्री नवी दिल्लीत पोहोचलं. इस्राइल आणि ईराण यांच्यातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांना तिथून बाहेर काढण्यासाठी ऑपरेशन सिंधु सुरू करण्यात आलं आहे. इराणमधल्या भारतीय नागरिकांना, तेहरानमधल्या भारतीय दूतावासाशी आणि नवी दिल्लीतल्या परराष्ट्र मंत्रालयाच्या २४ तास सुरू असलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

ऑपरेशन सिंधुमार्फत नेपाळ आणि श्रीलंका या शेजारी देशांच्या विनंतीवरुन त्यांच्या नागरिकांनाही परत आणण्यात येणार आहे. या नागरिकांनी इराणमधल्या भारतीय दूतावासाशी संपर्क साधावा असं दूतावासाच्या समाजमाध्यम खात्यावर म्हटलं आहे.

<><><><>

इस्राएलचा हल्ला सुरु असेपर्यंत आपण भविष्यातल्या आपल्या अणु कार्यक्रमाबद्दल चर्चा करणार नसल्याचं इराणनं म्हटलं आहे.

इराणच्या अणु कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यासाठी फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी आणि युरोपियन युनियनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी काल जिनिव्हा मध्ये इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतल्यानंतर इराणनं आपली भूमिका स्पष्ट केली.

दरम्यान, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी सुरक्षा परिषदेला संबोधित केलं आणि इराण-इस्राएल दरम्यानचा तणाव तातडीनं कमी करण्याची विनंती केली.

**<><><><>**

इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर इस्त्राएलनं केलेल्या हल्ल्यांमुळे अणु प्रदूषणाचा धोका असल्याचं आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेचे महासंचालक राफेल ग्रोसी यांनी म्हटलं आहे. इराणमधल्या अणुप्रकल्पांवर झालेल्या हल्ल्यांमुळे तिथल्या आण्विक सुरक्षेत घट झाली आहे, मात्र गळती होणाऱ्या क्ष-किरणांनी अजूनही धोकादायक पातळी ओलांडली नसल्याचं ग्रोसी यांनी सुरक्षा परिषदेच्या आपत्कालीन बैठकीत  सांगितलं.

**<><><><>**

भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्राने पॅरिस डायमंड लीग २०२५ मध्ये पुरूषांच्या भालाफेक स्पर्धेत विजेतेपद मिळवलं. ऑलिम्पिकविजेत्या चोप्राने पहिल्याच प्रयत्नात ८८ मीटर १६ सेंटीमीटर अंतरावर भालाफेक करत विजेतेपदाला गवसणी घातली.

**<><><><>**

कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये आज मध्यम ते जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><>//**